

# मुमुक्षूसाठी

**सद्‌गुरु श्री. सिद्धयोगेश्वर महाराज**
गिरगांव--मुंबई

अनंतकाळापासून जीवाने केलेल्या आपल्या पाप-पुण्य कर्मामुळे, असंख्य योनीत भटकणारा जीव अपार कष्ट व सुख दुःख सहन करून देव दुर्लभ अशा मानव योनीत जन्माला येतो. आणि मानव जन्म मिळून भगवंताच्या कृपेने जर सत्संग प्राप्त झाला तर, माणसाचे जीवन धन्य होईल. परंतु अशी स्थिती ही मनुष्याने जन्मजन्मांतरीच्या केलेल्या सत्कर्माचे फळ असते. सत्संगामुळे अज्ञानरूपी अंधकाराचा नाश होतो, व परमानंद नित्य सुखाची प्राप्ति होते.

सर्व जीव सुखाच्या शोधातच अनंत काळापासून भटकत आहेत. **या संसारांतील सर्व कर्मे सुख आणि शांती प्राप्त होण्यासाठीच जीवाकडून केली जात आहेत;** परंतु जन्मल्यापासून देहत्यागापर्यंत कल्पनातित हाल अपेष्टा सोसून, रात्रंदिवस प्रयत्न करून सुद्धा मानवाला या भौतिक सुखाच्या प्राप्तिने शाश्वत सुख व चिरकाल शांती प्राप्त झाली आहे कां ? तर त्याचे नाही हेच उत्तर द्यावे लागेल. कारण सर्व सामान्य जीव ज्या वस्तुपासून सुखाची अभिलाषा करतो ते सुखच नसते, तर तो केवळ सुखाचा आभास असतो. नाशिवंत वस्तु आणि व्यक्ति त्याचप्रमाणे परिवर्तनशील परिस्थितीत शाश्वत सुखाची अनुभूति प्राप्त होणे संभवत नाही. या भौतिक जगतातील सुखे नश्वर आणि अशाश्वत आहेत. व अशा अनित्य सुखांच्या प्राप्तिसाठी धडपडणारा जीव परत बंधनात पडून आपला अधःपात करून घेतो. त्यामुळे अशा जीवाची जन्म-मृत्युच्या चक्रातून मुक्तता होणे असंभवनिय आहे.

दुर्लभ असा मानव जन्म प्राप्त होवुनही जर मनुष्याने सर्व दुःखापासून सुटका करणारा, सर्व बंधनातून मुक्त करणारा जो मोक्ष आहे त्याच्या प्राप्तिचा प्रयत्न केला नाही तर, त्याला परत अनेक योनीत भटकत राहून त्या त्या योनीत प्राप्त होणाऱ्या नरक यातनातून त्याची सुटका होणे शक्य नाही. मानव हा पशु पक्षी प्रमाणेच एक जंतू आहे. परंतु **पशु-पक्ष्यापासून विभक्त करणारी, इतर योनीपेक्षा उच्च श्रेणी प्राप्त करून देणारी मनन शक्ति मानवाजवळ आहे.** या मनन शक्तिमुळेच मानवाला मानवत्व प्राप्त झाले आहे. या मनन-शक्तिलाच मानवता समजली जाते. अशा तऱ्हेने उच्च श्रेणी प्राप्त झालेल्या मानवाने सर्व बंधनातून

**नाकळे ते कळे, कळे ते नाकळे। वळे ते नावळे गुरुविण ।।**

मुक्त होण्यासाठी, परमात्मा प्राप्तिला योग्य असे **पवित्र जीवन बनवण्यासाठी, भक्तियुक्त अन्तःकरणाबरोबरच सत्संग, सद्‌गुण, त्याग, वैराग्ययुक्त सत्कर्म या सद्‌गुणांवर विशेष लक्ष दिलं पाहिजे**

सर्व जीव समुदायासाठी ज्या परमेश्वराने या विचित्र जगताची रचना केली त्या सर्व शक्तिमान-सर्वाधार परमात्म्याने जीवांच्या कर्मानुसार फल-भोगाची व्यवस्था करून ठेवली आहे. अशा त्या **परमेश्वराला प्राप्त करून घेण्याची दोन साधने आहेत. एक ज्ञानयोग** या ज्ञानयोगाचं मूळ भक्तितच आहे. **दुसरा कर्मयोग** या कर्म-योगातही भक्ति अनुस्युत आहे. **कर्मयोगाशिवाय मनुष्य ज्ञान-योगाचा अधिकारी होत नाही. भक्तिशिवाय केलेले कर्म यंत्रवत् होईल.** या ज्ञानयोगाने किंवा कर्मयोगात सर्वांना कारणरूप असणाऱ्या परमात्म्याला जाणल्याने मनुष्य सर्व बंधनातून मुक्त होऊ शकतो. ज्यांनी या परमात्म्याला जाणले आणि त्याला प्राप्त करून घेतले तो परत कधीही कोणत्याही कारणाने जन्म मरणाच्या बंधनात साडपत नाही. म्हणून त्या परम दयाळू परमात्म्याच्या प्राप्तिसाठी आपल्या आवडीप्रमाणे कोणत्याही एका साधनेला तत्परतेने लागले पाहिजे.

**अद्वैत उपासना सर्वसामान्य मनुष्याला अत्यन्त कठिण आहे.** या भवसागरातून तरून जाण्यासाठी आपली ईच्छा-शक्ति भगवंताच्या चरणी लावणे व त्या तऱ्हेने प्रयत्नपूर्वक तपसाधना करणे किंवा तत्त्वज्ञानाने परमेश्वर जाणणे हे निरक्षर अज्ञ जनांना अशक्यप्राय आहे. म्हणून परमात्म्याचे पूर्ण ज्ञान होण्यासाठी, **जीवाला सगुण-साकार भगवंताची उपासनाच मोक्षाच्या प्रगती-पथाला घेवून जावू शकते. मात्र भक्तिसाठी अन्तःकरणाची शुद्धता व दृढ श्रद्धा असली पाहिजे.**

भगवंताचे सख्य साधण्यासाठी त्याची शक्ति व लिलेच चिंतन करण्याने, तसेच प्रेमपुर्वक नाम-स्मरण करण्याने भगवंताच्या सगुणस्वरुपाच्या ठिकाणी प्रीति जडते. कथा ऐकण्याने, गुणांच्या गायनाने मनुष्याचा आत्मा भगवंताच्या जवळ जावून पोह-चतो. त्याच्या मंगलनामाचे निरंतर स्मरण करणाऱ्या मनुष्याची पापे कोणत्याही कष्टाविना नाहीशी होवून तो निष्पाप होतो. दुर्गुण जावून सद्‌गुणी होतो. असे सतत नामस्मरण करत राहिल्याने जीवाची सगुण स्वरुपाच्या ठिकाणी दृढ प्रीति निर्माण होते. त्या प्रीतिमुळेच परमात्मा आपल्या भक्तांस सगुण - साकार स्वरूपाने दर्शन देतो. अशी स्थिती प्राप्त झाल्यावर अंती तो भक्तिमान जीव आपल्या शुद्ध, पवित्र, आनंद-मय स्वरुपास ओळखून निर्गुण - निराकार परमात्म्यांत विलीन होवून जातो. मात्र भक्तिसाठी अन्तःकरणाची शुद्धता व दृढ श्रद्धा असली पाहिजे. अहंकार व दंभ यांना तिलांजली दिली पाहिजे. त्याचप्रमाणे भगवं-ताच्या प्रार्थनेत उपासनात्मक भाव असले पाहिजे. या गोष्टी जर असतील तर मग त्याला इतर कोणत्याही गोष्टींची अवश्यकता नाही.

**भगवंताच्या भक्तिला जात, वय, कुळ, धन सदाचार यांचा विचार करण्याची अवश्यकता नाही.** भक्त मग तो कोणत्याही जातीचा, वयाचा कोणत्याही कुळाचा, निर्धन असो वा सदाचार संपन्न नसो, भक्त कसाही असला तरी तो भगवंताला प्राप्त करून घेवू शकतो. भगवंत प्रतिज्ञापूर्वक ग्वाही देत आहेत की,

**" कौन्त्येय प्रति - जानी हि नये भक्तः प्रणश्यतिः ॥ "**

हे कौन्त्येया, तूं असे निश्चितपणे सत्य समज कि माझा भक्त कधीहि नाश पावत नाही.

पुराणांतील व इतिहास कालांतील सत्पुरुषांची चरित्रं वाचली तर भगवंताच्या वचनाची प्रचिती येईल.

**नर अथवा नारी हो का दुराचारी। मुखी गाता हरि पवित्र तो ॥**

चोखा-सेना हे कोणत्या उच्च वर्णीय समजल्या जाणाऱ्या जातीतील होते. ! ध्रुव - प्रल्हाद यांचे असे किती वय होते ? विदुर - कान्होपात्रा हे कोणत्या उच्च कुळाचे होते ? व्याध - शबरी यांनी असा कोणता सदाचार पाळला होता ? ते ज्या स्थितींत जसे होते, त्या स्थितींत त्यांना परमेश्वराची प्राप्ति झाली, भगवंताला ते प्रिय झाले. कारण ते सर्वजण दृढ श्रद्धेने निष्काम भक्तिने परमेश्वराशी एकरुप झाले होते. **भगवंत हा भक्तिप्रिय आहे.** तो भक्तिनेच संतुष्ट होतो ; इतर गुणाने नाही. भक्ति म्हणजे परमेश्वराशी निष्काम भावनेने केलेली प्रेममय आसक्ति. भगवंताच्या कृपेवर विश्वास ठेवून आत्मसमर्पण करणे यालाच भक्ति म्हणतात. आपल्याला विषय सुखाची प्राप्ति व्हावी, किंवा कोणत्याही **भौतिक सुखाच्या कामनेने केलेली भक्ति म्हणजे परमेश्वराची खरी भक्ति नव्हे.** तर परमेश्वराच्या चरणी संपूर्ण शरणागत होवून आत्मसमर्पण केले पाहिजे. तन-मन-वाणी परमेश्वराला अर्पण करणे, याला शरणागती असे म्हणतात. **संध्येच्या पळीने हातावर पाणी सोडुन तोंडाने "श्रीकृष्णार्पण मस्तुः" असे म्हणण्याने ती वस्तु परमेश्वराला अर्पण केली असे होत नाही,** तर अव्यभिचारी भक्तिने एका परमात्म्याशिवाय या जगांत आपल्याला कोणाचाच आधार नाही, असे समजून मान, किर्ती आणि आसक्ति यांचा त्याग करून शरीरावरील आणि संसारांतील अहंता-ममतारहित होवून एक परमेश्वरच आपला सर्वस्व आहे, आपला आश्रय तोच आहे; तोच आपल्याला परमगती देण्यास समर्थ आहे. असे समजून परमेश्वराची **भक्ति दृढ होण्यासाठी सतत प्रेमपुर्वक त्याचे नाम व त्याच्या स्वरूपाचे चिंतन करीत अनन्य भावाने शरण गेले पाहिजे.** सर्व जग हे त्या परमेश्वराचं आहे, असे समजून आपले कर्तव्य म्हणून आळस व निष्क्रियता टाकून सदासर्वदा कार्यस्त असतांनामुद्धा, मन आणि बुद्धिच्या द्वारे भगवंताचे स्मरण - मनन केले पाहिजे. यालाच निष्काम कर्म भक्ति योग म्हटले आहे. या योगाने परमेश्वराची प्राप्ति निश्चित होते. कर्म त्यागाने सिद्धीची प्राप्ति होत नाही. तसेच कर्मत्याग हे अशक्यहि आहे. म्हणून ज्या परमात्म्याने या संपूर्ण जगतात सर्व भूतांची उत्पत्ती करून, आपण स्वतः या संपूर्ण जगताला व्यापून राहिला आहे. त्या परमेश्वरास आपल्या स्वभाव - कर्मानुसार अनन्य भावाने शरण जाऊन त्याच्या स्वरूपाशी दंग झाले पाहिजे. **भगवंताची आज्ञा असे मानून मन वाणी, व शरीराने स्वतःच्या वर्णानुसार सर्व कर्माचे आचरण करणे हीच भगवंताची भक्ति होय.** याने परमसिद्धीरूपी मोक्षाची प्राप्ति होवू शकते.

मोक्षाच्या चार पायऱ्या आहेत. **श्रवण, मनन, निधो - ध्यास, व साक्षात्कार.** भगवंताच्या स्वरूपाचे, त्याच्या गुणांचे, लिलेचे व त्याच्या प्राप्तिचे ज्ञान श्रवण करून ते मनात ठसल्यावर त्याचे मनन केले पाहिजे. स्मरण करून श्रवण केलेल्या गोष्टीचे योग्यायोग्य विचारांसह अन्तःकरणांत दृढपणे ठसविणे याला मनन म्हणतात. जर मनन केले नाहीतर श्रवण केलेल्या गोष्टीचे विस्मरण होईल व तसे विस्मरण झाले तर सद्गुरुच्या समागमाने प्राप्त झालेला अलभ्य लाभ व्यर्थ होईल. **मनन केल्यानेच परमेश्वराविषयी श्रवण केलेले ज्ञान अन्तःकरणांत दृढ होऊ शकते.** त्यामुळे मनुष्य स्वरुपानुसंधान करण्यास समर्थ होऊ शकतो. निरंतर मननाने मन निर्विषय, निर्लेप होवून मनुष्य आपल्या स्वरुपाशी लीन होतो. असा पुरुष संसारातील सर्व तऱ्हेची सुखे भोगूनही अलिप्त राहून जीवनमुक्त व विदेहीमुक्त होतो.

**निर्गुणी पावले सगुणी भजता । विकल्प धरिता जिव्हा झडे ।।**